नि. दि. मु. नं. ७८/२०१३

**(CNR No.MHAK07-000887-2013 )**

: **निशाणी २६ वर आदेश** :

१. वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ चे नांव वगळुन त्यांचे वारस अभिलेखावर आणण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जाच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास औपचारिक हरकत घेतली व अर्जात काहीही योग्यता नाही, त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादीचे कथन असे की, वादीने प्रस्तुत दावा घोषणा, निरंतर मनाई हुकुम, वाटणी व स्वतंत्र ताबा मिळण्यासाठी प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ मोतीराम गणपत लांडे हे दिनांक १३/०९/२०१६ रोजी मरण पावले. वादी, प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र. ३ हे प्रतिवादी क्र. २ चे कायदेशीर वारस आहेत जे अभिलेखावर अगोदरच पक्षकार म्हणुन आलेले आहे. प्रातिवादी क्र. १ चे इतर कायदेशीर वारस म्हणजे प्रतिवादी क्र. १ ची विवाहीत मुलगी नामे इंदु शालीग्राम पाटील असुन ते अभिलेखावर आणणे अत्यंत आवश्यक आहे. करिता प्रतिवादी क्र. १ ची मुलगी नामे श्रीमती इंदु शालीग्राम पाटील हिला अभिलेखावर घेण्यात यावे.

४. प्रस्तावीत प्रतिवादी क्र. ३ इंदुबाई शालीग्राम पाटील यांनी त्यांचे म्हणणे नि. क्र. ३२ वर दाखल करुन सदर अर्जास विरोध केला. वादीने दावा दाखल केला त्यावेळी माहिती लपवून ठेवून प्रतिवादी क्र. ३ ला पक्षकार केले नाही. परंतु प्रतिवादी क्र. १ मयत झाल्यानंतर आणि पाच वर्षाच्या कालावधीनंतर वादी त्यांचे नांव प्रतिवादी क्र. ३ म्हणुन अभिलेखावर आणत आहे. तो कायदयाच्या दृष्टीने संयुक्तीक नाही. करिता अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ मोतीराम गणपत लांडे हे दिनांक १३/०९/२०१६ रोजी मरण पावले. प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३ ही प्रतिवादी क्र. १ ची मुलगी असल्याने तिला पक्षकार म्हणुन अभिलेखावर आणणे दाव्याचे स्वरुप पाहता आवश्यक

असल्याचे दिसुन येते. अर्जातील नमूद कारण पाहता ते संयुक्तीक आहे. प्रस्तुत अर्जाचे स्वरूप पाहता दोन्ही पक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण होण्यासाठी मयत प्रतिवादी क्र. १ ची कायदेशीर वारस प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३ ला वारस सामील करणे न्यायाच्या दृष्टीने हितास्तव आहे. सबब अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**<u>: आ दे श :</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी क्र. १ चे वारस म्हणुन प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३ इंदुबाई शालीग्राम पाटील यांना सामील करुन त्यांना अभिलेखावर घेण्यात येते.

३. वादीने दाव्याच्या शिर्षकामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

सही/-

(चं. प्र. रघुवंशी)

बाळापूर.

दिनांक : ०७.१२.२०१८.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S.V. Indane. |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 07/12/2018. |
| Signed by Presiding Officer on | : | 07/12/2018. |
| Uploaded on | : | 07/12/2018. |

------------------------------------------------------------------------------------------